**पस्तिसावा दीक्षांत समारंभ**

**दि. २० डिसेंबर २०१८**

**मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे प्रास्ताविकपर भाषण**

नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पस्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी पद्मविभूषण मा. श्री. कृष्णस्वामी कस्तुरीरंगन, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व पूर्व-कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो...

विद्यापीठाच्या पस्तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून आपणा सर्वांचे सहृदय स्वागत करतो. आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेल्या प्रमुख अतिथींचा परिचय देण्याचे भाग्य मला लाभले आहे, याविषयी प्रथमतः आनंद व्यक्त करतो.

आज दीक्षांत समारंभासाठी, प्रमुख अतिथी म्हणून आपल्याला, भारतीय अवकाश-शास्त्रज्ञ, पद्मविभूषण मा. श्री. कृष्णस्वामी कस्तुरीरंगन हे लाभलेले आहेत. श्री. के. कस्तुरीरंगन हे १९९४ ते २००३ या कालावधीत 'इस्रो' या भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे संचालक होते. २००३ ते २००९ या कालावधीत ते राज्यसभेचे खासदार राहिले आहेत. त्यांचा जन्म दक्षिण भारतातील केरळ राज्यातील एर्नाकुलम या छोट्याशा गावी दि. २४ ऑक्टोबर १९४० रोजी झाला. लहानपणीच आकाशनिरीक्षणाचा छंद त्यांना जडला व त्यांच्या मनात खगोलशास्त्राने घर केले. आकाशाचे रहस्य जाणण्याची उत्कट इच्छा त्यांच्या मनात खोलवर रुजली. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणात त्यांना भौतिकशास्त्र व गणितात गोडी निर्माण झाली. मुंबई विद्यापीठातून त्यांनी भौतिकशास्त्रात एम. एससी. पदवी मिळविली. पुढे अहमदाबादच्या फिजीकल रिसर्च लेबॉरेटरीमध्ये (पी. आर. एल. या संस्थेत) त्यांना डॉ. विक्रम साराभाई यांचे दोन वर्षे प्रत्यक्ष सानिध्य लाभले. डॉ. विक्रम साराभाई यांनी त्यांना प्रायोगिक भौतिक संशोधक म्हणून घडविताना खगोलशास्त्रातील संशोधनासाठी- विशेषतः उपग्रह तंत्रशास्त्रामध्ये काम करण्यासाठी सतत मार्गदर्शन केले, प्रोत्साहनही दिले. 'आर्यभट्ट' या भारताच्या पहिल्या

उपग्रहाच्या विकासात के. कस्तुरीरंगन यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. 'भास्कर १', 'भास्कर २' या प्रायोगिक भूसर्वेक्षण उपग्रहांच्या निर्मितीत आणि भारतीय रिमोट सेन्सिंग सॅटेलाईटच्या (आय. आर. एस.) निर्मितीत, त्यांनी नेतृत्व करत, महत्त्वाची कामगिरी बजावली. आपल्या कठोर वैज्ञानिक विश्लेषण आणि मूलभूत संशोधनावरील निष्ठेने त्यांनी भारतीय अवकाश संशोधनात मोठमोठे टप्पे गाठले. अवकाश आयोगाचे अध्यक्ष आणि भारत सरकारच्या अवकाश विभागाचे सचिव म्हणून त्यांनी नऊ वर्षे कार्य केले. भारताचा अवकाश कार्यक्रम राबविताना शास्त्रज्ञ-तंत्रज्ञ आणि अभियंत्यांचे नेतृत्व करणारे कुशल संघनायक ते ठरले. भारतीय शासनाने अत्यंत प्रतिष्ठेच्या पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या तीनही पुरस्कारांनी त्यांना गौरविलेले आहे. असे, भारतीय अवकाश कार्यक्रमाद्वारे भारताचा जगात नावलौकिक उंचावणारे, मा. के. कस्तुरीरंगन आज आपल्यात उपस्थित आहेत. त्यांची उपस्थिती आम्हा सर्व घटकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

मित्रहो, दि. १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. सन २००४मध्ये कर्मयोगी संत गाडगे बाबा ह्यांचे नाव ह्या विद्यापीठाला देण्यात आले. अगदी स्थापनेपासूनच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करत, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत, शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य विद्यापीठाने चालविले आहे. आज **३८२** महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित असून **१३५** महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2(f)/12(B)सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विद्यापीठात चार विद्याशाखांतर्गत विविध महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांतून पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले असून यंदाच्या उन्हाळी परीक्षेत ६६२ परीक्षांमधून अंदाजे तीन लक्ष शेहेचाळीस हजार परीक्षार्थी सहभागी होतील. विद्यापीठ परिसरात एकूण २८ शैक्षणिक विभाग असून यावर्षी लोककला हा विभाग नव्याने सरू करण्यात आला आहे. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरतर्फे(नॅकतर्फे) 'अ'श्रेणी प्राप्त करणारे आपले विद्यापीठ कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कटिबद्ध आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी विद्यापीठ नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तसेच कौशल्यविकासाच्या व सामाजिक विकासाच्या उपक्रमांवर विशेष भर देत, गुणवत्तेचे एक एक शिखर गाठत आहे. विद्यापीठाच्या गुणवत्तेचे एक गमक म्हणजेच गुणवत्ता यादीतील तसेच संशोधनक्षेत्रातील आजचे यशवंत. आज दीक्षांत समारंभामध्ये विद्यापीठातर्फे विविध विद्याशाखांमधील ३७८ संशोधकांना आचार्य(पीएच.डी) पदवी, विविध परीक्षांतील गुणवत्ता यादीत स्थान

पटकावणाऱ्यांना १०५ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके, २४ रोख पारितोषिके तसेच ३९,७३० विद्यार्थ्यांना पदवी व ४० विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आली.

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालये यांतून विविध शैक्षणिक विकासात्मक कामे प्रगतिपथावर आहेत. 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान(रुसा)'अंतर्गत विद्यापीठाने संस्थात्मक विकास प्रस्ताव (IDP) मुंबई येथील विभागीय कार्यालयास सादर केला होता. त्यापैकी रु. १० कोटी पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच संशोधनक्षेत्रातही विद्यापीठाची प्रगती सुरू असून विविध विभागांमधून संशोधनप्रकल्प राबविले जात आहेत. सद्यःस्थितीत विद्यापीठातील विभागांमधून सहा संशोधन प्रकल्प सुरू आहेत. या वर्षी सूक्ष्मजीवशास्त्र विभागास मुंबई येथील राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाकडून दोन बृहद संशोधन प्रकल्प मंजूर झालेले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'सॅप' योजनेअंतर्गत रासायनिक तंत्रज्ञान विभागास अनुदान मंजूर झाले आहे. या दोन्ही विभागांच्या योजनांसाठी विद्यापीठास एकूण रु. १ कोटी ४२ लक्ष रुपयांचे अनुदान मंजूर झाले. याशिवाय विद्यापीठाच्या 'विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र, लोणार' याविषयीच्या प्रस्तावपूर्व मागणीस, मुंबई येथील राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाकडून मान्यता मिळाली असून, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने तपशीलवार प्रस्ताव सादर करण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे भूगर्भशास्त्रीय, पर्यावरणीय, खगोलशास्त्रीय तसेच पुरातत्त्वशास्त्रीय दृष्टिकोनातून लोणार येथील तथ्यांच्या संशोधन कार्यास चालना मिळणार असून, लोणार या जागतिक वारसा स्थळाचे जतन व संवर्धन करण्यास हातभार लागणार आहे. 'रुसा' अंतर्गत विद्यापीठास ट्रायबल डेव्हलपमेंट नोडल सेंटरला मान्यता मिळाली असून त्या अंतर्गत रु. २.५० कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे मेळघाटातील आदिवासी कोरकू, भिल्ल, गोंड या आदिवासी जनजातींच्या उन्नतीला हातभार लागणार आहे.

या वर्षी दि. २० व २१ एप्रिल २०१८ रोजी स्टार्ट अप इंडिया २०१८- इनोव्हेटिव्ह प्रदर्शनी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत २३६ संशोधक विद्यार्थांनी सहभाग घेत 'स्टार्ट अप इंडिया- इनोव्हेट, स्टार्ट, सक्सिड' या विषयावर नावीन्यपूर्ण मॉडेल्स सादर केलेत. दि. १ मे २०१८ रोजी 'ॲन एनव्हीजन्ड जर्नी' या हिततुल्य घटकांच्या सभेचे विद्यापीठाने आयोजन केले. त्यात सर्व स्टेकहोल्डर्स, शैक्षणिक क्षेत्रातील जाणकार, संशोधक, माजी विद्यार्थी, उद्योजक

सहभागी झालेत. उद्योजक तयार होण्यासाठी शासनाने दिलेल्या 'इन्क्युबेशन सेंटर'ची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्या अंतर्गत दोन दिवसीय 'उद्योजकता जनजागृती कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. त्यास विविध महाविद्यालयांतील २००विद्यार्थी तसेच ८उद्योजक उपस्थित होते. इनक्युबेशन सेंटरद्वारे स्टार्टअप जनजागृती व कार्यान्वयनासाठी महाराष्ट्र शासनाकडून पाच कोटींचे अनुदान अपेक्षित आहे. दि. १८ मे २०१८ रोजी विद्यापीठाने २०१९ ते २०२४ या पाच वर्षांच्या कालावधीचा बृहद आराखडा तयार करण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापक व उद्योजक ह्यांची विचारविनीमय कार्यशाळा आयोजित केली. दि. १३ व १४ डिसेंबर २०१८ रोजी शारीरिक शिक्षण विभाग व आय. क्यू. ए. सी. यांच्या वतीने 'शारीरिक शिक्षण आणि क्रीडाविज्ञानातील स्वयंरोजगारक्षम कौशल्यविकास' या विषयांवर तिसऱ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठातील गणित विभागाने कारंजा(लाड) येथील इन्नानी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध प्रवाह' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. याव्यतिरिक्त गृहविज्ञान विभाग, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, संगणक विभाग, रसायनशास्त्र विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, उपयोजित परमाणू विद्युत विभाग, गणित विभाग या विभागांनी अनुक्रमे 'विद्यापीठ महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य व कायदेविषयक सक्षमीकरण', 'महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्यविषय मार्गदर्शन कार्यशाळा', 'समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर सत्रपद्धती : समस्या आणि आव्हाने ', 'माहिती तंत्रज्ञान व मराठी विश्वकोश', 'ऑप्टीकल मेथड्स ऑफ ॲनॅलिसिस'-सेमिनार स्पर्धा , 'माती परीक्षण कार्यशाळा', 'एल. ई. डी. लॅम्प फॅब्रिकेशन कार्यशाळा', 'गणित विषयांतील कौशल्यविकास कार्यशाळा' ' पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सेमिनार स्पर्धा' आणि 'नेट-सेट कार्यशाळा' या विषयांवर चर्चासत्र-कार्यशाळा-परिषदांचे आयोजन केले. संलग्नित महाविद्यालयांतर्फेदेखील विविध विषयांवर चर्चासत्र-परिषदांचे आयोजन करण्यात आले.

शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांविषयी आदर व अभिमान व्यक्त करण्यासाठी या वर्षीदेखील विद्यापीठाने 'मराठी भाषा गौरव दिना'चे भव्य प्रमाणात आयोजन केले. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध संस्था, महाविद्यालये, मराठी प्रेमी नागरिक यात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

विद्यापीठाच्या युजीसी-मानव संसाधन विकास केंद्राद्वारे आयोजित २ उद्‌बोधन वर्ग, ४ उजळणी वर्ग आणि एक अल्पावधी वर्ग यांमधून २५० शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. विद्यापीठ व

महाविद्यालयीन शिक्षक यांना कौशल्यविकासाचे ऑनलाईन प्रशिक्षण मिळावे, यासाठी या केंद्रास, मनुष्यबळ विकास मंत्रालयाने या वर्षी 'नॅशनल रिसोर्स सेंटर' म्हणून घोषित केले आहे. देशभरात २७ विद्यापीठांना मंजूर झालेल्या केंद्रांपैकी 'कौशल्यविकास' हा महत्त्वाचा विषय केवळ आपल्या विद्यापीठाला दिलेला असून या विषयातील प्रशिक्षण देणारे आपले एन.आर.सी. हे देशभरात एकमेव आहे, ही आपल्या विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. आपल्या एन.आर.सी.च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'इनोव्हेशन अँड बेस्ट प्रॅक्टिसेस इन एज्युकेशन स्किल्स' या उजळणी वर्गाला, देशभरातून अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभला असून, आतापर्यंत या वर्गासाठी देशभरातून एकूण १३९३ शिक्षकांनी नोंदणी केली आहे. विद्यापीठाच्या मानव संसाधन विकास केंद्राद्वारे 'ट्रेन द ट्रेनर' हा उपक्रमही राबविण्यात येतो. मानव संसाधन विकास केंद्रास विविध योजनांतर्गत युजीसीने रु. ५४.७० लक्ष निधी मंजूर केला आहे.

विद्यापीठाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत या वर्षी 'व्हर्च्युअल सी फोर सेंटर : ज्ञानाचे एक नवे दालन ....आपणापर्यंत!' या उपक्रमाद्वारे संलग्नित महाविद्यालयांच्या ठिकाणी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करून तसेच पुनर्प्रक्षेपणाच्या साहाय्याने विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा समाजाला लाभ घडवून देण्याचा प्रयत्न केला.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना या वर्षी विविध मानसन्मान प्राप्त झालेत. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची 'राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदे'च्या ('नॅक'च्या) सर्वोच्च कार्यकारी समितीच्या सदस्यपदी नियुक्ती झाली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची 'नॅशनल मॉनिटरिंग समिती'वर सदस्य म्हणून नियुक्ती झाली. रासायनिक तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ यांची महाराष्ट्र शासनाच्या विद्यापीठांमधील कौशल्य शिक्षण याविषयीच्या समितीवर तसेच भारतीय रासायनिक अभियांत्रिकी संस्थेच्या मंडळावर नियुक्ती झाली. दि. १ मे २०१८ रोजी शिक्षणक्षेत्राचा नावलौकिक उंचावणाऱ्या विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठातर्फे 'उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

संशोधनक्षेत्रात विद्यापीठाचा विद्यार्थी वर्गदेखील उत्तम कामगिरी बजावत आहे. गोंडवाना विद्यापीठात जानेवारी २०१९मध्ये संपन्न होणाऱ्या १३व्या 'आविष्कार' स्पर्धेसाठी ३४ विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या चमूमध्ये निवड झाली आहे.

कलाक्षेत्रातही विद्यापीठ चमू उत्तम कामगिरी करत आहेत. सप्टेंबर २०१८मध्ये

श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यात एकूण २२ कलाप्रकारांतून, १८५ संलग्न महाविद्यालयांचे एकूण ३०६४ विद्यार्थी सहभागी झालेत. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे ऑक्टोबर २०१८मध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत विद्यापीठ चमूने तृतीय स्थान पटकावले. डिसेंबर २०१८मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशीक आयोजित महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' स्पर्धेत विद्यापीठ चमूचा सहभागी झाली आहे. तसेच जानेवारी २०१९मध्ये विद्यापीठ चमू संबलपूर विद्यापीठ ओरिसा येथे मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात सहभागी होणार आहे.

कला स्पर्धांप्रमाणेच क्रीडा स्पर्धांमध्येदेखील विद्यापीठ चमूंनी उत्तम कामगिरी केली आहे. सत्र २०१८-२०१९मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत जलतरण (पुरुष) चमू आणि मल्लखांब (पुरुष) चमू यांनी तृतीय स्थान पटकावले आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत भारोत्तोलन (महिला) वैयक्तिक प्रकारात कु. पूजा केने हिने तसेच शरीरसौष्ठव (पुरुष) वैयक्तिक प्रकारात दीपक पवार याने रौप्यपदक तर कुस्ती (महिला) वैयक्तिक प्रकारात कु. तेजस्विनी दहीकर हिने कास्य पदक पटकावले आहे. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत पुरुष चमूने तृतीय स्थान पटकावले आहे. नेहमीप्रमाणे याही वर्षी विद्यापीठातर्फे २०१७-२०१८ या सत्रासाठी उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.

सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी विद्यापीठातर्फे उपयोजित कौशल्य विकास वर्गांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सूत्रसंचालन, स्पोकन इंग्लिश, उपकरण हाताळणी या विषयांवरील प्रशिक्षण वर्गांचा समावेश आहे. 'लाईफ कोपिंग स्कील्स'अंतर्गत संवादकौशल्य आणि जीवनशैली या विषयांवर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांतून एकूण १५१ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

विचारांचे आदानप्रदान, प्रशिक्षण, संशोधन इत्यादींना चालना मिळावी म्हणून विद्यापीठाने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. या वर्षी विद्यापीठाने एम. एस. एम. ई. मंत्रालय, ए गव्हर्नमेंट ऑफ इंडिया सोसायटी अंतर्गत औरंगाबाद येथील इंडो-

जर्मन टुल रूम यांच्यात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सामंजस्य करार केला. त्या अंतर्गत उद्योगांच्या मागणीनुसार रोजगाराभिमुख कौशल्यविकासावर आधारित अल्पमुदत अभ्यासक्रम आणि पदविका अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात आलेत. भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत, स्वच्छ ऊर्जा' या उपक्रमांतर्गत या वर्षी विद्यापीठाने रुफटॉप सोलर प्लँटच्या माध्यमातून नैसर्गिक वीजनिर्मितीसाठी मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोल्युशन्स प्रा. लि., मुंबई या कंपनीशी करार केला. या करारानुसार ही कंपनी विद्यापीठाला २५ वर्षे ३.६२ रु. प्रती युनिट या दराने वीज उपलब्ध करून देणार आहे. विद्यापीठाला वर्षाला १२ लक्ष युनीटची गरज असून त्यापैकी ८.५ लक्ष युनीट वीजनिर्मिती सौर ऊर्जे प्रकल्पातून होणार असल्याने वर्षाकाठी विद्यापीठाची ३०लक्ष रुपयांची बचत होणार आहे. शिवाय ८३५ टन कार्बनडायऑक्साईडचे उत्सर्जन कमी होणार असल्याने निसर्गाचे व पर्यावरणाचे संवर्धन होण्यास विद्यापीठाचा हातभार लागणार आहे. या वर्षी विद्यापीठाने बांबू व हस्तकला केंद्राची (भाऊ) स्थापना केली असून या केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन कुलपती के. विद्यासागर राव यांच्या हस्ते संपन्न झाले. तरुणांमधील रोजगारनिर्मितीला चालना मिळावी, हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून, या केंद्राद्वारे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम व प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी विद्यापीठाचा इतर बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रांशीदेखील सामंजस्य करार झालेला आहे.

विद्यापीठात संत, महापुरुष, विविध विचारधारा इत्यादींच्या अभ्यासासाठी आणि प्रसारासाठी विविध अध्यासने कार्यरत आहेत. या वर्षी बौद्ध अभ्यास केंद्राद्वारे 'बौद्ध तत्त्वज्ञान : काळाची गरज' या विषयावर दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. महानुभाव अध्यासनाने विद्याभारती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. २१-२२ एप्रिल २०१८ रोजी महानुभाव साहित्य संमेलनाचे आयोजन केले. डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रात स्व. डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या दुर्मीळ छायाचित्रांची गॅलरी उभारण्यात आली. डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्रामध्ये संविधान सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन, अध्यापन या बाबींकडे लक्ष पुरविणाऱ्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांची तरतूद केली आहे. या योजनांमध्ये प्रामुख्याने विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना, संत गाडगे बाबा ग्रामीण विद्यार्थिनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना, संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना

यांचा समावेश आहे. या विविध योजनांमधून ११५ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. तसेच विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेत ३८२ महाविद्यालये आणि २९ पदव्युत्तर विभागांतील एकूण २,०१,०३४ विद्यार्थ्यांचा सुरक्षा विमा काढण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, रक्तदान, जलव्यवस्थापन व जलसंधारण, युवा दिवस रॅली, महिला सक्षमीकरण कार्यशाळा, जिल्हानिहाय विशेष शिबिरे, जिल्हानिहाय आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण शिबिरे, 'आंतरराष्ट्रीय योग दिन' इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध राज्यस्तरीय कार्यशाळा, शिबिरे यांतून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. कारंजा लाड येथील इन्नानी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका कु. मेघा अरविंद कोटक हिची रशियाला जाणाऱ्या भारतीय युवक प्रतिनिधी संघात निवड झाली तसेच रासेयो स्वयंसेवक पुसद येथील वत्सलाबाई नाईक महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. पूजा केवटे आणि आकोट येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी सागर लापूरकर यांची २०१९च्या दिल्ली येथील राष्ट्रीय गणतंत्र दिनासाठी निवड झाली असून ते विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. दि. २९ ते ३० जानेवारी २०१८ रोजी झरी-झामणी, जि. यवतमाळ, येथे आदिवासी कुमारी माता प्रश्नासंदर्भात केळापूर येथील शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी महिला सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस १६० कुमारी माता उपस्थित होत्या. कुमारी मातांच्या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. सामाजिक बांधिलकी राखत विद्यापीठाने केलेल्या कार्याने शिक्षणक्षेत्रात सामाजिक संवेदनेबाबत एक प्रकारे आदर्श निर्माण केला, असे याबाबत म्हणता येईल. कुमारी मातांच्या समस्येवर संशोधन व विस्तारकार्य करण्यासाठी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडे विद्यापीठाने प्रस्ताव दाखल केलेला आहे आणि त्यास मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या उन्नत भारत अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण व रोजगार, ग्रामविकास यांसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यापीठास ग्रामीण भागात काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील पाच गावांची या अभियानासाठी निवड करण्यात आली असून त्या गावांच्या सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तेथील गरजांनुसार प्रकल्प तयार करण्यात येतील.

विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात वनमहोत्सवादरम्यान एकूण ५०० रोपांची लागवड

करण्यात आली. विद्यापीठातर्फे दरवर्षी 'पर्यावरण पुरस्कार' तसेच 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार' प्रदान करण्यात येतात.

विद्यापीठास समृद्ध असे ग्रंथालय लाभले आहे. 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६'नुसार त्याचे नामकरण आता 'ज्ञानस्रोत केंद्र' असे झाले आहे. या केंद्रात १,१७,०२७ ग्रंथ, २९७५ आचार्य पदवी प्रबंध, २००पेक्षा जास्त नियतकालिके, अकरा ऑनलाईन डेटा बेसेस इत्यादी ज्ञानसंपदा उपलब्ध आहे. 'ज्ञानस्रोत केंद्रा'द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये प्रामुख्याने पोर्टल सेवा, महाविद्यालयांसाठी कन्सॉर्शिया सेवा आणि डॉक्युमेंट डिलिव्हरी सर्व्हिस यांचा समावेश करावा लागेल. पोर्टलमार्फत इझी प्रॉक्सी या आज्ञावलीचा उपयोग करून शिक्षक आणि संशोधकांना विद्यापीठ परिक्षेत्रात नसतानासुद्धा माहिती-स्रोत हाताळता येतात. याव्यतिरिक्त ज्ञानस्रोत केंद्राच्या संलग्नित महाविद्यालयांसाठी विकसित कन्सॉर्शियाद्वारे विद्यापीठाचे सर्व इ-रिसोर्सेस महाविद्यालयांना उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रंथसाधनांची वानवा असलेल्या ग्रामीण भागातील ज्ञान-संशोधनाचा प्रश्न सुटणार आहे. या वर्षी राज्य शासनाकडून, 'निवासी ज्ञान स्रोत आणि संशोधन केंद्रा'ची स्थापना करण्यासाठी ५ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे, ज्याद्वारे शहराच्या मध्यभागी २०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व संशोधनपूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

विद्यार्थी मित्रहो, संत गाडगे बाबांच्या विचारांना डोळ्यापुढे ठेवून आपल्या विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. संत गाडगे बाबांनी जीवनात जगत असताना "थोडा तरी परोपकार करावा", असे सांगितले आहे. त्यानुसार **आपण सर्वांनी आपल्या समाजाच्या, देशाच्या, रंजल्यागांजल्या व्यक्तींच्या समस्या दूर करण्यासाठी थोडे तरी योगदान दिले पाहिजे.** संत गाडगे बाबांनी गोरगरिबांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना "जेवणाचे ताट मोडा, हातावर भाकर खा, काटकसर करा, पण आपल्या पोराबाळांना शिक्षण द्या", असे आवाहन केले होते. आजही **शिक्षण हे बहुमोल आहे**. गाडगे बाबांनी त्यासाठीच गोरगरिबांना काटकसर करण्यासाठी सुचविले होते. **आज शिक्षण आपल्याला सहजपणे उपलब्ध झालेले आहे. तेव्हा, त्याचे मोल ओळखा व त्यात उत्तमोत्तम ज्ञानसंपादन करून आपल्या राष्ट्राला घडवा.** "शिक्षण हाच तरणोपाय आहे", हे राजर्षी शाहू महाराजांनीदेखील विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सांगितले होते. तेव्हा हे आळखून मार्गक्रमण करावे, असे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

येणाऱ्या नव्या वर्षासाठी सर्वांना शुभेच्छा देतो.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो. पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**धन्यवाद !**
**जय हिंद, जय महाराष्ट्र !**